उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३५८ ■ गुरूवार १ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26


PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

## सहा ऑक्टोबरला इंडिया आघाडीच्या खासदारांचा निवडणूक आयोगावर मोर्चा, राष्ट्रपतींची भेट घेणार



नवी दिल्ली, दि. ३० : निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धती आणि मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या मुद्द्यावरून इंडिया आघाडीने आंदोलनाची घोषणा केली आहे. बुधवारी नवी दिल्ली येथे झालेल्या आघाडीच्या बैठकीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान देशभर जिल्हास्तरावर लोकशाही बचाव मार्च काढण्यात येणार आहे. तसेच ६ ऑक्टोबरला विरोधी पक्षांचे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढणार आहेत. या बैठकीत निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदार याद्यांमधील बदल आणि एसआयआर प्रक्रियेसंदर्भातील मुद्द्यांवर चर्चा झाल्याचे आघाडीच्या नेत्यांनी सांगितले.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या माहितीनुसार, २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत. या आंदोलनामागील भूमिका जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. इंडिया आघाडीतील विरोधी पक्षांचे सर्व खासदार ६ ऑक्टोबरला निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे मोर्चा काढणार असल्याचे खरगे यांनी सांगितले. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

राष्ट्रपतींची भेट घेण्याची तयारी

ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात इंडिया आघाडीचे नेते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेण्यासाठी वेळ मागणार आहेत. या भेटीत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित मुद्दे आणि घटनात्मक प्रश्नांबाबत निवेदन सादरण्याची तयारी असल्याचे (पान ४ वर)

## तीन हजार कोटींचे ड्रग्ज् अरबी समुद्रात जप्त केले

गांधीनगर, दि. ३० : भारतीय तटरक्षक दल आणि गुजरातच्या दहशतवादविरोधी पथकाने अरबी समुद्रात मोठी संयुक्त कारवाई केली. त्यात आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्करीचा डाव उधळून लावला. या कारवाईत इराणी बोटीसह तब्बल ५२६ किलो हेरॉईन आणि मेथाम्फेटामाईन जप्त करण्यात आले. या अंमली पदार्थांची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे तीन हजार कोटी असल्याचे सांगण्यात आले. कारवाई दरम्यान बोटीवरील पाच पाकिस्तानी नागरिकांना अटक करण्यात आली. लक्षद्वीपजवळील सागरी हद्दीतून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची तस्करी होणार असल्याची गुप्त माहिती भारतीय तटरक्षक दलाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे तटरक्षक दलाने सागरी तसेच हवाई पाळत वाढवली होती. दरम्यान, एक संशयित इराणी बोट भारतीय सागरी हद्दीच्या दिशेने येत असल्याचे (पान ४ वर)

## शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणी विशेष चौकशी पथक संस्थाचालकांचे धाबे दण आणले, एजंट झाले भूमिगत

**धुळे दि.३०- शालार्थ आयडी घोटाळा चौकशी समिती धुळे शहरात दाखल झाली असून ती वेगवेगळ्या संस्थांमध्ये जाऊन चौकशी करत असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. शालार्थ आयडी घोटाळ्यामध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झाला असून शासनाला सुनियोजित पणे चुना लावण्यात आला आहे. संस्थाचालक त्यांच्याच कार्यालयातील खास पंटर किंवा कर्मचारी यांच्या मदतीने शिक्षणाधिकाऱ्यांच्या खोट्या सह्या करणे किंवा शिक्षण खात्याच्या मदतीने पात्र नसलेल्या उमेदवारांची भरती करून घेणे. रोस्टरची अंमलबजावणी न करणे पूर्वी लावलेल्या लोकांना डावलून आपल्या नातेवाईकांना जुने हजेरी पत्रक तयार करून नोकरी देणे, असे अनेक प्रकार यामध्ये आहेत. या सर्वांचे पगार हे शासनाने काढले असून त्यांच्या नेमणुका नियमानुसार आहे की नाही याची चौकशी धुळ्यात दाखल झालेले पथक करीत आहे. मिळालेल्या माहितीनुसार या पथकाचे नेतृत्व शंकर वाघमोडे हे करत आहे.**

शालार्थ आयडी घोटाळा हा धुळे नंदुरबार व जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक प्रमाणात आहे. घोटाळे करणाऱ्यांनी अशा काही क्लुप्त्या वापरल्या आहेत की, त्याच्या अनेक सुरेस कथा भविष्यात लिहिणे शक्य होणार आहे. शासनाने विशेष चौकशी पथकासाठी विशिष्ट नमुन्यांमध्ये माध्यमिक विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीस मान्यता देतानाच्या तपासावयाच्या बाबींची तपासणी सूची प्रत्येक संस्थेला या अगोदर अवगत करून दिली आहे. यानुसार ही माहिती भरून २० सप्टेंबर पर्यंत मागितली होती. याच बरोबर संबंधित उमेदवाराने प्रमाणपत्र देऊ प्रस्ताव सादर करताना दाखल कागदपत्राच्या प्रती जोडून त्यात काही खोटे आढळल्यास आपण सर्वस्वी जबाबदार असू असे लिहून देणे क्रमप्राप्त होते.

धुळे जिल्ह्यात दाखल झालेली एसआयटी गेल्या दोन दिवसापासून वेगवेगळ्या संस्थांमध्ये जाऊन चौकशी करत आहे. धुळे जिल्ह्यातील २०१६ ते २०१९ यादरम्यानचे १९७ शालार्थ आयडी घोटाळ्यातील उमेदवारांची चौकशी होणार आहे. तर २०१९ ते २०२५ यादरम्यानच्या ६८६ एवढ्या उमेदवारांची चौकशी होणार आहे.या चौकशीत किती जण योग्य व नियमानुसार भरले गेले याचा आकडा भविष्यात पुढे येणार आहे.

**संस्थाचालकांची शाळा, भ्रष्टाचार**

अनधिकृत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मुस्लिम भागातील जवळपास ११ संस्थांची चौकशी (पान २ वर)

## मंत्री वुईकेंच्या स्वागतप्रसंगी भाजप पदाधिकाऱ्यांची अनुपस्थिती; साक्रीत राजकीय चर्चेला आले उधाण



**साक्री, दि.३०- तालुक्यातील बारीपाडा येथे चैत्राम पवार यांच्या पुढाकारातून आयोजित वनभाजी महोत्सवाच्या निमित्ताने राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके साक्री तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यादरम्यान साक्री येथील शासकीय विश्रामगृहात त्यांच्या स्वागत व सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**

भाजपचे धुळे जिल्हा सरचिटणीस शैलेंद्र आजगे यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमाला मंत्री डॉ. अशोक वुईके यांच्यासह आमदार मंजुळाताई गावित उपस्थित होत्या. आमदार गावित यांच्या समर्थक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची विश्रामगृहात मोठी उपस्थिती दिसून आली.

मात्र, साक्री तालुक्यात भाजपची संघटनात्मक ताकद असल्याचे सांगितले जात असताना तसेच साक्री नगरपंचायतीतही भाजपचे नगराध्यक्षांसह विविध समित्यांमध्ये पदाधिकारी असताना या स्वागत कार्यक्रमाला स्थानिक भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची लक्षणीय अनुपस्थिती (पान ४ वर)

## ओमप्रकाश अग्रवाल अमृतमहोत्सवानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन



धुळे, दि.३०- भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि उद्योग, सहकार, शिक्षण व समाजकारण क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व श्री. ओमप्रकाशजी पुरणमलजी अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त धुळे शहरात विविध भक्तिमय व सत्कार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायं. ६.३० वाजता मालेगाव रोडवरील खानदेश गोशाळेच्या भव्य मैदानावर (पान ४ वर)

## शिवतीर्थ जवळील नाल्यालगत प्लॉट निर्मिती करणाऱ्या अधिकाऱ्यां विरुध्द कारवाई करा- उबाठा सेनेची मागणी



**धुळे, दि.३०- साक्री रोड, शिवतिर्थ चौकातील श्री. जैन मंदिरामागील शहराचा मुख्य व ब्रिटिश कालीन नैसर्गिक नाला युध्दपातळीवर बंद केला जात आहे. सदर नाल्यातून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचा निचरा होतो. परंतु नाल्यालगत मोठ्या प्रमाणावर १५ फुट उंच मातीची भर टाकण्यात येत आहे, व प्लॉटची निर्मिती केली जात आहे. यापूर्वी येथे रहिवास प्लॉट नसतांना महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन प्लॉटची निर्मिती केलेली दिसते. याची सखोल चौकशी करण्यात यावी. अशी मागणी शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी म नपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

अस्तित्वातील नाला बुजविणे किंवा त्यांची रुंदी कमी करणे, प्रवाह वळवणे, कायदयाने गुन्हा असतांना, सदर ठिकाणी जेसीबी मशीनने प्लॉटचे (पान ४ वर)

## जि.बँक नोकर भरती यादी वेबसाईटवर

धुळे, दि.३०- धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सरळ सेवा नोकर भरती प्रक्रिया पूर्ण करून पात्र उमेदवारांची यादी बँकेच्या वेबसाईटवर दि.१ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधरी यांनी दिली आहे.

बँकेच्या सरळ सेवा नोकर भरती प्रक्रिया टीसीएस-आयओएन पूर्ण करून क्लर्क पन्नास पदे अतांत्रिक, दहा विविध पदांची तांत्रिक अशा पात्र उमेदवारांची अंतिम यादी टीसीएस-आयओएन कंपनीने प्रमाणीत करून बँकेस पाठविलेली आहे. त्यानुसार बँकेच्या वेबसाईटवर अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

## चितोड चौफुली जवळ वाहनचालकाची लुट

धुळे, दि.३०- शहरातील चित्तोड रोड चौफुली जवळ वाहन चालकाला मारहाण करीत त्याच्याकडील रोकडसह मोबाईल लुटून नेला. याप्रकरणी धुळे शहर पोलिस ठाण्यात तीन ते चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

अब्दुल जबार अब्दुल रौफ (वय २६, रा. भारतनगर, अकोट) असे चालकाचे नाव आहे. मंगळवारी (ता. २९) पहाटे साडेचार च्या सुमारास तो आपल्या वाहनाने सुरत सुरत वळण महामार्गावरून जात होता. शहरातील चित्तोड चौफुली जवळून जात असताना तीन ते चार जणांनी त्यांचे वाहन अडवले. अब्दुल रौफ यास (पान ४ वर)

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख द्या अन्यथा दिवाळी साजरा करू देणार नाही; पवार

**नंदुरबार, दि.३० (प्रतिनिधी)- दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने दुष्काळग्रस्त भागातील पिकांचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली. गेल्या वर्षीचा पीकविमा तातडीने द्यावा, कर्जमाफीचा निर्णय वेळेत घ्यावा, मजुरांना २५ हजार रुपयांची कौटुंबिक मदत द्यावी तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करावी, अशी मागणीही त्यांनी केली. या मागण्यांवर सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही तर मंत्र्यांना दिवाळी साजरी करू देणार नाही आणि त्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा रोहित पवार यांनी दिला.**

रोहित पवार यांनी बुधवारी नंदुरबार तालुक्यातील भालेर आणि रनाळे परिसरातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी शेतांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच रस्त्यातील मेंढपाळ वस्तीलाही भेट देऊन तेथील नागरिकांच्या समस्या समजून घेतल्या.

नंदुरबार जिल्ह्यात कापसाचे जवळपास १०० टक्के नुकसान झाले असून अनेक ठिकाणी कापसाला बोंडच आलेले नाही. ज्या ठिकाणी बोंड दिसत आहेत, तेथेही त्यांची वाढ खुंटलेली आहे. मक्याची परिस्थितीही गंभीर असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर सरकारने कोणताही भेदभाव न करता सरसकट पंचनामे करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कर्जमाफीचा लाभ अद्याप बहुतांश शेतकऱ्यांना (पान ४ वर)



## दुष्काळग्रस्त मदत उपाय योजनांची तात्काळ अंमलबजावणी करा- भाकप

**धुळे, दि.३०- महाराष्ट्रात पर्जन्यमान अतिशय कमी प्रमाणात असल्याने खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या हातातून गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. जिल्ह्यात दुष्काळग्रस्त मदत उपाय योजनांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या पदधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

निवेदनात नमुद केले आहे की, पाऊस (पान ४ वर)

## विनापरवानगी वृक्षतोड; दंड न भरल्याने मनपा वृक्ष विभागाने केला गुन्हा दाखल

**धुळे, दि.३०- शहरातील बेकायदेशीर वृक्षतोडीस आळा घालण्यासाठी धुळे महानगरपालिकेच्या वृक्ष विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. विनापरवानगी कपोल वृक्ष तोडल्याप्रकरणी तसेच महानगरपालिकेने बजावलेला दंड न भरल्यामुळे प्रमोद वसंत सूर्यवंशी यांच्याविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

या प्रकरणी आनंद शामराव सोनवणे यांनी कल्याणी नगर, महिंदळे शिवार येथील ओपन प्लेसमधील (पान २ वर)

## देवभाने जवळ अनोळखी महिलेची निर्घृण हत्या; परिसरात खळबळ



**सोनगीर दि. ३० (प्रतिनिधी)- मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील देवभाने शिवारात एका ४० ते ४५ वर्षे वयाच्या अनोळखी महिलेची डोक्यात गंभीर वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना बुधवारी संध्याकाळी ५:३० ते ६ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. धुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तापी पाईपलाईनजवळ आणि एका बंद पडलेल्या चामड्याच्या कारखान्याशेजारी हा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.**

प्राथमिक माहितीनुसार, या महिलेचा खून इतरत्र कुठेतरी करण्यात आला असावा आणि हत्येचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह या महामार्गालगत आणून टाकण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, रक्ताचा स्राव रस्त्यात किंवा घटनास्थळी जास्त होऊ नये म्हणून मारेकऱ्यांनी महिलेच्या डोक्याला पांढऱ्या रंगाचे कापड घट्ट गुंडाळले होते.

मृत महिलेचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असून महिलेच्या अंगावर काळ्या-निळ्या पक्षांची नक्षी असणारी पिवळ्या रंगाची साडी आणि लहान पांढऱ्या नक्षीचा गुलाबी रंगाचा टॉप आहे. तसेच मृतदेहावर लाल, हिरव्या व पांढऱ्या रंगांची डिझाइन असले-ली चादर आढळून आली आहे. कोणाला (पान ४ वर)

## लाचखोर तलाठीसह दोघांना दोन दिवस पोलीस कोठडी

धुळे, दि.३०- वाळू वाहतुकीस परवानगी देण्याच्या मोबदल्यात वीस हजार रुपयांची लाच स्विकारणारा ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), दोन खासगी पंटरांना अटक करण्यात आली. दोघांना न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

ग्राम महसूल अधिकारी मोहित बाबासाहेब वारे (३९, सजा कुसुंबा) याच्यासह प्रदीप विश्वास पाटील (रा. कौठळ, ता. धुळे), स्वप्निल रामकृष्ण देसले (रा. वाडीभोकर रोड, देवपूर) या दोन खासगी व्यक्तींनी तक्रारदाराकडे वाळू वाहतुक परवानगी देण्यासाठी वीस हजार (पान ४ वर)

## शहादा न.प.च्या सभेत एकोणावीस पैकी सोळा विषय मंजूर; तीन विषय स्थगित



**शहादा, दि.३० (का.प्र.)- शहादा नगरपरिषदेची बुधवारी झालेली सर्वसाधारण सभा काहीशी आक्रमक परंतु खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पालिकेच्या कै. काशिनाथ सजन पाटील सभागृहात दुपारी साडेतीन वाजता सभेला प्रारंभ झाला. या सभेला मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांच्यासह विविध विषय समित्यांचे सभापती, तसेच सत्ताधारी व विरोधी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते, तर उपनगराध्यक्ष माधवीताई मकरंद पाटील खाजगी कामानिमित्त बाहेरगावी असल्याने अनुपस्थित होत्या. सभेच्या विषय पत्रिकेवर एकूण १९ विषय ठेवण्यात आले होते, त्यापैकी १६ विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

यामध्ये प्रामुख्याने प्रेस मारुती मैदान येथील खुल्या जागेतील वसुलीसाठी बाह्य यंत्रणा मक्तेदार नियुक्त करणे, नगरपरिषद शाळांच्या इमारतींची दुरुस्ती व पायाभूत सुविधा पुरवणे, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत नगरपरिषद शाळा क्रमांक ३ येथे (पान २ वर)

## माणिकनगर परिसरात एकाला मारहाण

धुळे, दि.३०- शहरातील चाळीसगांवरोड माणिक नगर परिसरातील नूर मोहम्मद वलीयोददीन पटवे (वय ४१, रा. वीर शिवाजी चौक, माणिक नगर, धुळे) यांच्याशी रविवारी (ता.२७) रात्री काहींनी वाद घातला. शिवीगाळ, दमदाटी करुन हाताबुक्क्यांनी मारहाण केली. एकाने त्याच्या हातातील धारदार वस्तुने कानावर मारुन दुखापत केली. याप्रकरणी नूर मोहम्मद वलीयोददीन पटवे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित शरीफ शब्बीर पिंजारी, चांद शब्बीर पिंजारी, अबरार पिंजारी, एक महीला (सर्व रा. माणिक नगर, जिओ टॉवरमागे, धुळे) यांच्याविरुद्ध चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,38,000 रु.+3% GST
सोने- 24 K -1,50,000 रु.+3% GST
चांदी- 2,27,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## तरूण रोजगारापासून वंचित राहू नये भाजपाचे हर्षवर्धन दहितेचे प्रतिपादन



**साक्री, दि.३०- ग्रामीण व शहरी भागातील तरुण पिढीमध्ये प्रचंड क्षमता आणि कौशल्य आहे. गरज आहे ती फक्त त्यांना योग्य व्यासपीठ आणि संधी उपलब्ध करून देण्याची. पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून एकाच छताखाली अनेक नामांकित कंपन्यांना एकत्र आणून तरुणांच्या स्वप्नांना भरारी देण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हा प्रामाणिक प्रयत्न आहे. एकही सुशिक्षित तरुण रोजगारापासून वंचित राहू नये, हाच शास-नाचा ध्यास आहे. तरुणांनी मिळालेल्या संधीचा सोने करून आपल्या कुटुंबाच्या व परिसराच्या विकासात योगद-ान द्यावे, असे प्रतिपादन धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा भाजपा चे युवा नेते हर्षवर्धन दहिते यांनी व्यक्त केले. साक्री येथे आयोजित पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजग-ार महाकुंभ प्रसंगी ते बोलत होते.**

महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे व साक्री येथील श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्र च्या स्वयंरोजगार विभाग च्या संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ चे साक्री येथील साईराम नगर येथे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उद्घाटक हर्षवर्धन दहिते व प्रमुख अतिथी म्हणून साक्री तालुका मराठी पत्रकार समन्वय समितीचे अध्यक्ष विजय भोसले, भाजप साक्री मंडल अध्यक्ष महेंद्र देसले, जैताने मंडल अध्यक्ष चंद्रकांत पवार, नगरस-ेवक दिपक वाघ, शहर उपाध्यक्ष विनोदकुमार पगारिया, जिल्हा कौशल्य (पान २ वर)

मा.दादासाहेब औक्षवंत व्हा....!



नगराध्यक्ष मा.श्री.अभिजितदादा पाटील

यशवंत, किर्तीवंत कर्तुत्ववान, तेजोभास्कर, बहुगूणी व्यक्तीमत्व सदैव कार्यमग्न, प्रेरणादायी, चैतन्यमय, उत्कर्षशील नेतृत्व तथा शहादा नगरीचे नगराध्यक्ष मा.श्री.अभिजितदादा पाटील आपण औक्षवंत व्हा....!

शुभेच्छूक



तुषारगिरी गोसावी
सरचिटणीस- महाराष्ट्र प्रवेश युवक काँग्रेस
शहादा, जि.नंदुरबार

# आपला महाराष्ट्र

## फुटीर आणि उर्वरितांचे भवितव्य : काल, आज, उद्या

वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरदराव पवार यांनी बंडखोरी केली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. ते मुख्यमंत्री झाले. वयाच्या ३८ व्या वर्षी त्यांना मुख्यमंत्री पदाचा मान मिळाला. मुळामध्ये आणीबाणीनंतर काँग्रेसमध्ये जी फूट पडली त्यात इंदिरा काँग्रेस आणि देवराज अर्स यांच्या नेतृत्वाखाली अर्स काँग्रेस अशा दोन गटांमध्ये विभागणी झाली. १९७८ च्या निवडणुकीत जनता पक्ष आघाडीवर होता. परंतु त्या पक्षाला महाराष्ट्रात बहुमत मिळू शकले नाही. इंदिरा काँग्रेस आणि एस काँग्रेस यांनाही बहुमत मिळाले नाही जनता पक्षापेक्षाही कमी जागा त्यांच्याकडे होत्या. यशवंतराव चव्हाण हे अर्स काँग्रेसमध्ये होते. तेव्हा दोन्ही काँग्रेसने एकत्र येऊन जनता पक्षाला दूर ठेवताना सरकार स्थापन केले. त्यात वसंतदादा पाटील मुख्यमंत्री आणि नाशिकराव तिरपुडे उपमुख्यमंत्री झाले. मात्र पक्षांतर्गत धुसफुस चालूच होती. त्यातून सरकारमध्ये बंडखोरी झाली आणि शरदराव पवार ३८ आमदारांचा गट घेऊन बाहेर पडले त्यांनी समांतर काँग्रेस स्थापन केली आणि पुलोद सरकारची स्थापना केली. या सरकारात कम्युनिस्ट पक्ष, शेकापक्ष, समाजवादी आणि भारतीय जनता पार्टीचे सदस्य होते. त्यास त्यांनी पुरोगामी लोकशाही दल असे नाव दिले. साधारणपणे अडीच वर्षे हे सरकार चालले. त्या काळात वसंतदादा पाटील यांचे कार्यकर्ते आणि इंदिरा काँग्रेसचे कार्यकर्ते यांच्या शाब्दिक चकमकी होत असत. त्यामुळे शरदराव पवारांनी खुलासा करून आपण वसंतदादांचे सरकार का पाडले यासंबंधीचे विवेचन दिले. इंदिरा काँग्रेस मधील नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या कार्यपद्धती विषयी असलेली नाराजी त्यांनी व्यक्त करून दाखविली होती.

दरम्यान वसंतदादा पाटील यांच्याशी कटुता निर्माण झाली होती तरी वसंतदादांनी १९८८ मध्ये पुन्हा शरद पवारांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी पुढे केले आणि कटुता संपविली. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील फुटीची ती ऐतिहासिक घटना होती. त्यानंतर शरदराव पवारांनी बऱ्याच वेळेला राजकीय वळणे घेतली. १९८६ मध्ये ते आणि त्यांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन झाले. राजीव गांधी यांच्या निधनानंतर पीव्ही नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये ते संरक्षण मंत्री झाले. नंतरच्या काळात कृषी मंत्री झाले. मुंबईच्या बॉम्बस्फोटानंतर त्यांनी पुन्हा मुख्यमंत्रीपद स्वीकारले होते. श्रीमती सोनिया गांधी यांच्या परदेशी असल्याच्या मुद्द्यावरून त्यांनी १९९९ मध्ये काँग्रेस सोडली आणि राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. मात्र लगेचच त्यांनी काँग्रेस बरोबर आघाडी करून राज्यात सरकार स्थापन केले आणि ते केंद्रात कृषी मंत्री झाले. राज्यात त्यांनी महाविकास आघाडीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकार काम करीत असतानाच शिवसेनेतील एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अनेक आमदारांनी बाहेर पडून गुवाहाटीचा रस्ता धरला. ती फूट खूपच वादग्रस्त ठरली तरी पण सरकार मध्ये भाजपसोबत सहभागी होतानाच एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पद मिळाल्यामुळे त्यांचा सत्तेचा पक्ष म्हणून आळख निर्माण झाली. त्या भांडवलावर त्यांचे स्वतःचे अस्तित्व असलेले शिवसेनेचे पक्ष नेतृत्व पुढे येऊ लागले. दरम्यान अजित पवार यांनी बंडखोरी करून राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाहेर पडत भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. अशा तऱ्हेने महाराष्ट्रात दोन वेळा काँग्रेसला समांतर असलेल्या दोन पक्षांमध्ये फूट पडली. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडखोरीची वसंतदादांच्या विरोधात जाऊन शरदराव पवारांनी केलेल्या बंडखोरीशी तुलना होऊ लागली परंतु त्या आणि या बंडखोरीत जमीन अस्मानाचा फरक आहे. शरदराव पवारांच्या बंडखोरीला इंदिरा काँग्रेसमध्ये पडलेली फूट कारणीभूत होती आणि अंतर्गत मतभेद कारणीभूत होते ती पार्श्वभूमी शिंदे यांच्या बंडखोरीला नाही. असे राजकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. राजकीय क्षेत्रातील अभ्यासक अशा प्रकारच्या घटनांचा अभ्यास सतत करीत असतात आणि त्यावरून अनुमान काढत असतात त्यानुसार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील फुटीची मीमांसा करताना त्यांनी शरदराव पवार यांच्या वसंतदादांच्या विरोधातील बंडखोरीशी तुलना केली होती

या फुटी नंतर २०२४ च्या निवडणुकीत वेगळे पक्षाचे चिन्ह मिळालेले असताना शरद पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचा जो गट शिल्लक होता त्याने चांगली कामगिरी केली. त्याच पद्धतीची कामगिरी शिवसेनेने केली. मात्र महाराष्ट्रभर प्रभाव पडेल असे चित्र काही निर्माण झाले नाही. शेवटी व्यक्तीवादी पक्ष नेतृत्व हे मापदंड राजकीय क्षेत्रात फार काळ चालत नाहीत तसेच आजच्या परिस्थितीत हे नेतृत्व निर्माण झालेले दिसत आहे. ही वाटचाल आणि सरकार मध्ये असलेले घटक पक्ष यांची वाटचाल सध्या बऱ्यापैकी सुरू असल्याचे दिसते. मात्र असे असले तरी ते अळवा वरच्या पाण्यासारखे अस्तित्व आहे. आज आहे उद्या नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यातल्या त्यात गेल्या काही दिवसांपासून अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या वावड्या उठत होत्या. दोन्ही पक्षातील किंवा गटातील बिनीचे नेते याबाबत वेगवेगळ्या चर्चा करीत असत. जवळपास सगळीच औपचारिकता पूर्ण झाली असून आता केवळ विलीनीकरणाचा मुहूर्त तेवढा शिल्लक असल्याचे बोलले जात होते. परंतु शरदराव पवारांनी वेळोवेळी ती शक्यता फेटाळून लावली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारमध्ये सहभागी होण्याचा किंवा सीमांकन विधेयकाला पाठिंबा देण्याचा मुद्दा जेव्हा पुढे आला तेव्हा तेव्हा शरदराव पवार यांच्या पक्षाचे नाव घेतले जात होते. केव्हा काय निर्णय ते घेतील आणि डाव टाकतील ते सांगता यायचे नाही अशी चर्चा त्यांच्या संदर्भात अनेक वर्षांपासून राजकीय क्षेत्रात आहे. म्हणून ते सरकारला पाठिंबा देण्याची भूमिका या संदर्भात घेऊ शकतात अशी अटकळ होती. पण आता त्यांनी त्यावर देखील पडदा टाकल्याचे चित्र निर्माण झालेले आहे. नुकतेच ते असे बोलले की आम्ही कोणाकडे जाणार नाही ज्यांना यायचे आहे त्यांनी आमच्याकडे यावे या त्यांच्या बोलण्यातून वेगवेगळे अर्थ निघतात. परंतु मुख्यतः ते रालोआ सोबत जाणार नाहीत. आणि दोन्ही राष्ट्रवादी विलीन होणार नाहीत असे ध्वनीत होते.

अलीकडच्या काळात केंद्रातील शासक पक्षाच्या विरुद्ध विरोधी पक्षाने रान उठविले आहे. सध्या तर स्वायत्त मानला जाणारा निवडणूक आयोगच तोफेच्या तोंडी आहे. ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह लागले असून त्यांच्या सहयोगी आयुक्तांनी त्यांच्यावर जे काही आरोप केले त्यावरून हा आयोग सरकारी पक्ष झाल्याचे राजकीय क्षेत्रातील जबाबदार नेत्यांचे म्हणणे आहे. हे सगळे वारे सध्याच्या परिस्थितीत शासक पक्षाच्या विरोधात वाहू लागल्याचे दिसते. तो कल लक्षात घेता शरदराव पवारांचे वक्तव्य त्यांनी अचूक वेळी केले असे मानता येईल. येणाऱ्या काळात सध्याच्या शासक पक्षाचे काय होईल यासंदर्भातील भविष्यातील चुनुक शरदराव पवारांना दिसली आहे म्हणूनच त्यांनी अशा पद्धतीचे वक्तव्य केले असेही मानले जाते. अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेसचा गट सरकार पक्षात आहे. ते सत्तेला सोडचिठ्ठी देण्याची शक्यता नाही. शिवाय घरातच सत्ता आणि घरातच विरोधी पक्षाची भूमिका या दोन्ही गोष्टी सोयीच्या असल्यामुळे आणि प्रत्येकाकडे कुठले ना कुठले अधिकार पद असल्यामुळे कुठलीही भूमिका घेतली तरी काही बिघडत नाही अशी थोडी अवस्था शरदराव पवारांच्या संदर्भात असल्याचे मानले जाते. ते जरी ठामपणे आपण रालोआ मध्ये सहभागी होणार नाही असे म्हणत असले तरी त्यांची वक्तव्ये आणि प्रत्यक्षातील कृती यात महदअंतर असते असा राजकीय क्षेत्रातील अभ्यासकांचा होरा आहे. सध्या केंद्रातील सत्तेला त्यांची गरज नाही. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्या पक्षातील फुटीर गट सरकारमध्ये असणे आणि सरकार व्यवस्थित चालू असणे. यातही सध्या काही फेरबदल होतील अशी शक्यता दिसत नाही. काही काळानंतर अस्तित्वाचा मुद्दा जर समोर आला तर सत्तेत असलेल्या आणि सत्तेत नसलेल्या अशा दोन्ही गटांच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहणार आहे. त्या गटांना महाराष्ट्रातील जनतेने कितपत समर्थन द्यावे याबद्दल सुद्धा फैसला होईल. तसाच फैसला शिवसेनेच्या संदर्भात होईल. आणि मग सत्ता पक्षातील मुख्य पक्षाला एकला चालोरे ची भूमिका वठविण्याची वेळ येईल. त्यात ते किती यशस्वी होतील आणि एकतर्फी सत्तेवर येतील यासंबंधीचा फैसला तीन वर्षांनी होणार आहे. सहयोगी पक्षांशिवाय आपल्याला पर्याय नाही हे त्यांच्या लक्षात आल्यास ही गणिते आणखी बदलू शकतात एवढे खरे.

**नंदुरबार, दि.३०- (प्रतिनिधी) म्हसावद पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अवैधरित्या विदेशी मद्याची वाहतूक करणाऱ्या महिंद्रा बोलेरो पिकअप वाहनावर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत वाहनासह एकूण १० लाख ३७ हजार ४४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

# पिकअप मधून अवैध दारू वाहतुक दहा लाखांचा मुद्देमाल केला जप्त

२८ सप्टेंबर २०२६ रोजी म्हसावद पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शहादा मार्गे धडगावच्या दिशेने पांढऱ्या रंगाच्या पिकअप वाहनातून अवैधरित्या मद्याची वाहतूक केली जात आहे. या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी, शहादा यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसावद पोलिसांनी सापळा रचून संशयित वाहनाची तपासणी केली. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रॉयल गोवा व्हिस्की नावाचे लेबल असलेल्या १८० एमएल क्षमतेच्या मद्याच्या १८५ बॉक्समध्ये प्रत्येकी ४८ नग असा मद्यसाठा आढळून आला. तसेच महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप वाहन जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १० लाख ३७ हजार ४४० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. कारवाईदरम्यान संबंधित व्यक्तींना ताब्यात घेऊन मद्यसाठ्याबाबत चौकशी करण्यात आली. जप्त मुद्देमालाचा पंचनामा करून महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई), १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसावद पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संदिप वाघ, पोलीस उपनिरीक्षक कार्तिक दळवी, पोलीस उपनिरीक्षक उमेश पवार, पोलीस कर्मचारी उमेश पावरा, राकेश पावरा, राकेश महिरे, मुकेश राठोड आणि प्रवीण पवार यांच्या पथकाने केली.

टीप: दिलेल्या मजकुरात सुरुवातीला २० लाख ३७ हजार ४४० रुपये असा उल्लेख आहे; मात्र पुढील तपशीलात १० लाख ३७ हजार ४४० रुपये असा उल्लेख आहे. बातमीत तपशीलानुसार १० लाख ३७ हजार ४४० रुपये घेतले आहेत.

## वीज कंपनीचे साहित्य लांपास

धुळे, दि.३०- नकाने (ता. धुळे) शिवारातील वीज वितरण कंपनीचे तीस हजार रुपयांचे कंडक्टर चोरट्यांनी लंपास केले. मंगळवारी सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस आला. वीज वितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता अर्चना कन्हैयालाल मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला. हवालदार एम.बी. पाटील तपास करीत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्वबॅंका, सर्ववित्तिय पतसंस्था, यासी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकत वर्णन. तू.जि.धूळे पो.तू.ता.धूळे पैकी धूळे म.न.पा. हद्दीतील मौजे भोकर येथील सर्व्हे नं.२०६/१ पैकी प्लॉट नं. ९ चे एकूण क्षेत्र १६०.५० चौ.मी. बखळ प्लॉट.

| यासी | चतू:सिमा- |
|---|---|
| पूर्व- | प्लॉट नं.१६ |
| पश्चिमेस- | ६मी.रस्ता |
| दक्षिणेस- | प्लॉट नं.१० |
| उत्तरेस- | गट नं. २०५ पार्ट |

वरील वर्णनांचे बखळ प्लॉटचे मालक श्री. हितेंद्र रमेश पवार रा. ११६ विध्नहर्ता कॉलनी, वलवाडी शिवार, देवपूर धूळे यांनी उपरोक्त बखळ प्लॉटची कायमस्वरूपी विक्रीबाबत आमचे अशिल यांचेशी विक्रीचा सौदाकरार केला आहे.

मिळकत निर्बोज व निर्वेध असल्याचे सांगितले आहे. उपरोक्त बखळ प्लॉटचे बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, वहीवाट, कूळ जमीन जप्ती, टांच, वारस, बक्षिस, बोजा, सौदा करार, खरेदी-विक्री इ. बाबत हरकत असल्यास प्रस्तूतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पूरावा सादर करून शहानिशा करून दयावी. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही मूदतीत हरकत न आल्यास हरकतीचा विचार केला जाणार नाही. ते आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे प्रस्तूतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहीती व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धिस दिली असे.

दिनांक २९/०९/२०२६

**ॲड.ललित चांगदेव गायकवाड**
५ भावसार कॉलनी, जमनागिरी रोड, धुळे
मो.९७६४२८०४३४/९४०३८४४४७९



प्रकाश में आज- निशान




जितेंद्र राजेश खन्ना रेखा पुनम ढिल्लन अमरिशपुरी जीवन विजय अरोरा


## पान १ वरुन

### तरूण रोजगारापासून वंचित राहू नये

विकास केंद्र चे जिल्हा समन्वयक राहुल शेळके, संजय टेंभेकर, प्राचार्य रोहित खैरनार, निदेशक रामकृष्ण ढाके आदी उपस्थित होते. या महाकुंभात स्थानिक व परिसरातील सुमारे दीडशे तरुण-तरुणींनी सहभाग नोंदवून विविध नामांकित कंपन्यांमध्ये रोजगारासाठी मुलाखती दिल्या.

कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महाकुंभाचे भव्य उद्घाटन करण्यात आले. यावेळी विजय भोसले यांनी देखील मनोगत व्यक्त केले.या रोजगार महाकुंभात ऑटोमोबाईल, आयटी, मॅन्युफॅक्चरिंग, बँकिंग, रिटेल आणि सेवा क्षेत्रातील नामांकित कंपन्या आणि उद्योजकांनी भाग घेतला होता. सकाळपासूनच साक्री व परिसरातील तरुण-तरुणींनी नोंदणीसाठी मोठी गर्दी केली होती. स्थळावरच उमेदवारांच्या प्राथमिक मुलाखती घेऊन २० ते २५ पात्र उमेदवारांना ऑन-द-स्पॉट निवड पत्रे प्रदान करण्यात आली. यामुळे उपस्थित तरुण आणि पालकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ.विजय पाटील यांनी केले. या महाकुंभाच्या यशस्वितेसाठी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र चे तालुका समन्वयक डॉ विजय पाटील, शुभम वाघ, नितीन धामणे, राहुल कानडे, जगदीश गीते, सुनील पाटील, अल्काताई बिरारीस, सुरेखा जाधव, मयुरी साळुंखे, ययांनी विशेष परिश्रम घेतले. रोजगार महाकुंभ आयोजनाबद्दल साक्री तालुक्यातील सर्व स्तरातून आयोजकांचे व प्रशासनाचे विशेष अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

### शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणी विशेष चौकशी पथक

आतापर्यंत झाली आहे. यातील काही संस्थांमध्ये संस्थेचे कर्मचारी यांनीच एजंट बनून शालार्थ आयडी घोटाळ्यामध्ये सहभाग घेतल्याचे सांगितले जाते.तर काही काम करून देणारे खाजगी एजंट देखील यामध्ये सहभागी आहेत. शालार्थ आयडी घोटाळ्यामध्ये पूर्वी लावलेल्या कर्मचाऱ्याचा प्रस्तावना न पाठवणे व त्या ऐवजी आपल्या नातेवाईकाचा प्रस्ताव तयार करून मागील काही वर्षापासून तो नोकरीला आहे असे दाखवणे हा प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येतो . या मध्ये त्यांच्याच नातेवाईकाला जेव्हापासून त्याचं हजेरी पत्रक भरलं जात तेव्हा पासूनचा पगार त्याला मिळतो. हा सर्व पगार संस्थाचालक हडप करतात.हे आकडे फार मोठा आहे.तर दुसरीकडे पात्रता नसलेल्या उमेदवारांना देखील पैशाच्या लालसेपोटी नोकरी देण्याचे प्रकार संस्थाचालकांनी केले आहेत. हे सर्व करण्यासाठी संस्थेतील काम करणाऱ्या चंचल कर्मचाऱ्याला दलाल म्हणून नेमले जाते व तो सगळे नियम धाब्यावर बसवून उमेदवाराला मान्यता मिळवून देतो. दुसरीकडे खाजगी एजंट ने देखील पैसे कमवण्याच्या नादात फार मोठ्या उच्छाद माजवला आहे. अशा एजंटांच्या मालमत्ता या परिसरामधील लक्षवेधी ठरले आहेत.एवढ्या कमी कालावधीत एवढ्या मोठ्या मालमत्ता ते कसे उभारू शकले असे सवाल परिसरातील लोक उपस्थित करत असल्याने एसआयटी सर्व संबंधितांच्या मालमत्ता चा आढावा आपल्या चौकशीत घेईल का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**शिक्षण अधिकाऱ्यांच्या बोगस सह्या व शिक्क्यांचा वापर**

मुस्लिम भागातील दोन एजंटनी या सगळ्यांमध्ये कमाल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार शिक्षणाधिकाऱ्यांच्या बोगस सह्या मारणे, बोगस कागदपत्र तयार करणे , या मध्ये त्यांचा हात कोणी धरू शकणार नाही असे अनधिकृत पणे मिळालेल्या माहितीतून आढळून आले आहे. धुळ्यात आलेली एसआयटी अशा लोकांपर्यंत पोहोचू शकेल का? असा प्रश्न आहे.काही घटनांमध्ये शिक्षण खात्यातील लोकांनीच पैशाचा हव्यासापाई बोगस कामांना मदत केलेली आहे,मात्र आता एसआयटीला सामोरे जाताना ते सपशेल हात वर करून याच्याशी माझा संबंध नाही असे सांगण्याचा प्रयतक करीत असल्याचे अनधिकृत रित्या समजते . निव्वळ धुळे जिल्ह्यातून गेल्या दहा वर्षात ८८३ लोकांची पगार हे काय दोन-चार हजारांनी निघत नव्हता. ही रक्कम कोटी मध्ये असताना शिक्षण अधिकारी अथवा फंड मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना, आज पर्यंत शिक्षकांचा व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकडा कसा वाढला हे कधीच का लक्षात आले नाही. खिशातल्या पाकिटातले शंभर रुपये पडले तरी पाकीट उघडताच लक्षात येते. पण दररोज शिक्षण विभागामध्ये तेच ते काम करणाऱ्या माध्यमिक शिक्षण विभागाला दहा वर्षातील कालावधीमध्ये वाढलेली संख्या का लक्षात आली नाही हा प्रश्न यातून निर्माण झाला आहे.

**मुख्याध्यापक पळ काढला**

विविध सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार विशेष चौकशी पथकाने संस्थांना भेट देऊन माहिती घेण्याचा प्रयतक केला. यामध्ये आपली अडवणूक कुठे होऊ नये यासाठी त्यांनी स्वतःचे लॅपटॉप पासून ते प्रिंटर पर्यंत लागणाऱ्या सर्व वस्तू आपल्याच गाडीतून नेऊन चौकशी केल्याची समजते . एसआयटी आल्यामुळे चौकशीनंतर आपल्याला अटक होईल अशी भीती वाटल्याने एक दोन संस्थातील मुख्याध्यापक चौकशी समितीला कारण

दाखवू पळ काढत निघुन गेल्याचे देखील सांगितले जाते. बऱ्याचदा भरती केलेल्या कर्मचाऱ्याला नियमित करण्यासाठी मुख्याध्यापकांचा सहभाग संस्था चालकांना घेणे आवश्यक असते. अशावेळी दबावाला बळी पडून ज्या मुख्याध्यापकांनी शालार्थ भरतीची स्वामी केली आहेत ते या प्रकरणामुळे चांगले भयभीत झाले आहे.

**संस्थाचालकांची उलटी गिनती सुरू**

वेगवेगळ्या संस्थांमध्ये, संस्था ताब्यात घेण्यासाठी टोकाची भूमिका घेतली जाते ते शिक्षण महर्षी होण्यासाठी नव्हे. तर शिक्षण संस्था ताब्यात ठेवून त्यातून लाखोचा नफा कमवणे हाच अनेकांच्या बाबतीत दिसून आलेला आहे. कोणालाही कल्पना नव्हती अशा प्रकारे एक दिवशी चौकशी समिती येईल व आपण अडचणी सापडू. शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधी बोगस कर्मचाऱ्यांच्या भरती प्रकरणातून हडप झाला आहे, तो चौकशीतून कसा वसूल होईल हे आता बघायचे आहे.

**वाघमोडेंचा संपर्क होऊ शकला नाही**

नाशिक येथून आलेल्या विशेष चौकशी पथकाचे प्रमुख शंकर वाघमोडे यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकलेला नाही.

## पान १ वरुन

### विनापरवानगी वृक्षतोड; दंड न भरल्याने

वृक्षतोडीबाबत तक्रार दाखल केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने धुळे महानगरपालिकेच्या वृक्ष विभागाच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी संबंधित कपोल वृक्ष कटरच्या सहाय्याने पूर्णपणे तोडण्यात आल्याचे निदर्शनास आले.

याबाबत संबंधितांकडे विचारणा केली असता, वृक्षतोडीसाठी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असल्याची माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर वृक्ष विभागामार्फत आवश्यक कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करून संबंधितांना नियमानुसार दंड भरण्याबाबत नोटीस बजावण्यात आली. मात्र, नोटीस बजावूनही संबंधितांनी दंडाची रक्कम भरली नाही. त्यामुळे वृक्ष विभाग प्रमुख रविकिरण पाटकरी यांनी महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्या निर्देशानुसार धुळे तालुका पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

वृक्षतोड करण्यापूर्वी पूर्वपरवानगी घ्यावी

परवानगीशिवाय वृक्षतोड केल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येऊ शकते. नागरिकांनी वृक्षतोडीबाबतचे नियम पाळून महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मनपा वृक्ष विभागाचे प्रमुख रविकिरण पाटकरी यांनी केले आहे.

### शहादा न.प.च्या सभेत एकोणावीस पैकी

नवीन इमारत बांधकाम करणे, जैन प्लाझा ते साईबाबा नगर रस्त्याच्या प्रारंभी कमान बांधकाम करणे, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल स्मारकाचे सुशोभीकरण, आणि महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत शहादा शहर वाढीव पाणीपुरवठा योजना टप्पा-दोनच्या कामाला मुदतवाढ देणे या विषयांना मंजुरी मिळाली.तसेच वर्ग-४ च्या सफाई कामगारांना सुट्टीचा पगार देणे, पतविद्रेता योजनेचा मसुदा अवलोकन करून हरकती व सूचना संचालनालयास कळविणे, दिव्यांगांसाठी राखीव ५ टक्के निधी खर्च करणे, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील कचऱ्यामधून वस्तू तयार करण्याचे काम खाजगी संस्थेमार्फत करून घेणे, नगरपालिका हद्दीतील मोकाट गुरे-ढोरे पालकांना परत देण्यासाठी दंडाची रक्कम निश्चित करणे, साईबाबा नगरातील नारायण सोनवणे यांच्या घरासमोरील खुल्या जागेस क्रांतिवीर हुतात्मा वीरभाई कोतवाल यांचे नाव देणे आणि कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे आदी महत्त्वाचे विषयही यावेळी मंजूर करण्यात आले. दरम्यान, घनकचरा व्यवस्थापन स्थापत्य कामे व इतर अनुषंगिक कामांना मुदतवाढ देण्याचा विषय, पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेवरील पाणी बचतीबाबत नियोजन, आणि ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान राबविण्याच्या कामांतर्गत पंखे व दिवे बसविण्याबाबत विचारविनिमय करणे या तीन विषयांवर सभागृहात प्रदीर्घ चर्चा झाली. चर्चेनंतर हे तिन्ही विषय तूर्तास स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.सभेत दुष्काळी परिस्थिती व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे, पाणीपुरवठा विभागात मनुष्यबळ वाढविणे, दंडात्मक कारवाई करणे आणि जनजागृती करणे आदी मुद्द्यांवर सदस्यांनी आपली मते मांडली. यावेळी ठेकेदाराकडून पाणीपुरवठा योजनेची कामे डिसेंबरपूर्वी पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले. याशिवाय, आयत्या वेळच्या विषयात संविधान चौक सुशोभिकीकरण, दूरदर्शन भवन व अमरधाममधील अनुषंगिक कामे करणे, तसेच मांस विक्रीबाबत कायदेशीर कारवाई करणे या विषयांवरही मंजुरी घेण्यात आली.सभेदरम्यान बांधकाम सभापती संतोष वाल्हे यांनी आक्रमक भूमिका घेत गेल्या नऊ महिन्यांत बांधकाम विभागाच्या वतीने शहरात एकाही कामाचा शुभारंभ झालेला नसल्याचे निदर्शनास आणून दिले. मात्र, शहर विकासासाठी नगराध्यक्षांनी डीपी (विकास आराखडा) तयार करून शासनाकडून निधी उपलब्ध करून द्यावा, त्यासाठी आपण सर्वतोपरी मदतीस तयार असून पुढील पाचही वर्षे सहकार्य करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्वसाधारण सभेचे सूत्रसंचालन कार्यालय अधीक्षक दिलीप वसावे यांनी केले, तर आभार नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी मानले. या बैठकीत भाजपाचे प्रतोद ज्ञानेश्वर चौधरी, पाणीपुरवठा सभापती प्रदीप ठाकरे, बांधकाम सभापती संतोष वाल्हे, आरोग्य सभापती सुनील पाटील,नगरसेवक हरीश पाटील, सागर मराठे, भारती चव्हाण, वसीम तेली, ललित छाजेड, मुनेशचंद्र जगदेव आदींनी सक्रिय सहभाग घेतला.


## जाहीर समन्स

ॲड. हर्षल भा. अहिरराव, शिंदखेडा

**शिंदखेडा येथील मे.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात**

फौ. किरकोळ अर्ज नं. १६३/२०२६

**रंजित रामसिंग भिल** उ. व. ३४. धंदा : मजुरी
रा. परसामळ ता. शिंदखेडा जि. धुळे ....अर्जदार

**विरूद्ध**

**ग्रामविकास अधिकारी सो. ग्रामपंचायत**
**परसामळ ता. शिंदखेडा जि. धुळे .....जाबदेणार**

ज्याअर्थी वरील अर्जदार ह्याने त्याची आई जिजाबाई रामसिंग भिल हिचा मृत्यू मौजे परसामळ ता. शिंदखेडा तजि. धुळे येथे दि. ०१/०७/१९९५ रोजी घरी झालेला असून त्यासाठी जन्म -मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म - मृत्यू नोंदणी नियम २००० चे कलम ९ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद होवून मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहीर समन्स द्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जाचे कामी सुनावणी तारीख १६/११/२०२६ ठेवण्यात आली आहे. तरी या न्यायालयात वरील जन्माची नोंद होणेबाबत कोणाची हरकत असल्यास इतर हितसंबंध असल्यास या न्यायालयात दि. १६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून आपले म्हणणे सादर करावे. वरील तारखेस व वेळी कोणाची हरकत न आल्यास निर्णय देण्यात येईल. मग नंतर काही एक तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर समन्स नोटीस न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली असे.

दि. २४/०९/२०२६

सही...
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे

कोर्टाचा शिक्का



TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता.२७ से रोज २ खेल टा. ३,६ बजे
हनुमान अंश (हिंदी)
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.



TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता.२७ से रोज १ खेल टा. ९ बजे
द व्हान - फोर्स ऑफ द फॉरेस्ट (हिंदी)
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.



TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




दि. २ से ४ खेल टा.
१२, ३, ६, ९ बजे
9422789999/ 9823177599 Jyoticinemadhule.
bookmyshow



## PUBLIC NOTICE

This is to infom all the people, as well as all financial institutions, banks, credit societies, and all concerned parties, through this public notice that:

The property bearing Survey No. 18/2, located in the limits of shirpur Municipal Council, Mauje Shirpur, Taluka Shirpur, District Dhule, with an area of 00 Hectares 40 ares, and Pot Kharab 00 Hectares 05 ares, total 00 Hectares 45 ares, was purchased by our client,Mrs. Kalpanabai Uttamrao Mahajan, from Raghunath Mahipat Sonar on 27/08/1990 . The purchase deed was registered at the office of the Sub-Registrar, Shirpur, District Dhule, With registration number 1048/1990 dated 27/08/1990. This purchase deed is approximately 35 years old.

Our client, Mrs. Kalpanabai Uttamrao Mahajan, leased the above-mentioned property to Kisan Dnyanoday Mandal, Gudhe. The original purchase deed of this property has gone missing sometime around January 2025 from Kisan Dnyanoday Mandal's Homoeopathic Medical College and Hospital, Nimzari Road, Shirpur.

Despite extensive efforts to locate the original purchase deed, it has not been found, If the original purchase deed is found or comes into anyone's possession, it is requested that it be immediately returned to Kisan Dnyanoday Mandal's Homoeopathic Medical College and Hospital, Nimzari Road, Shirpur, District Dhule.

This public notice is being issued based on the information provided by our client.

Shirpur
Dated:30/09/2026

कोर्टाचा शिक्का

**Adv. Pravinsing J. Patil**
Office : Opp District &
Additional Session Court Shirpu Dist - Dhule

पान १ वरुन

## सहा ऑक्टोबरला इंडिया आघाडीच्या खासदारांचा

आघाडीच्या नेत्यांनी सांगितले.

**एक नोव्हेंबरला दिल्लीत मोठी रॅली**

इंडिया आघाडीने ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये आंदोलनाचा कार्यक्रम पुढे नेण्याचे संकेत दिले आहेत. एक नोव्हेंबरला दिल्लीत मोठी रॅली आयोजित करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या माध्यमातून निवडणूक प्रक्रियेशी संबंधित आपल्या मागण्या आणि भूमिका जनतेसमोर मांडण्यात येणार असल्याचे खरगे यांनी सांगितले. दरम्यान, इंडिया आघाडीच्या बैठकीत मतपत्रिकेचा वापर, पूर्वीच्या मतदार याद्यांचा संदर्भ, मतदार याद्यांमधील बदलांबाबत अधिक पारदर्शकता आणि अपीलची व्यवस्था यांसह विविध मागण्यांवरही चर्चा झाल्याचे वृत्त आहे.

## तीन हजार कोटींचे ड्रग्ज् अरबी समुद्रात जप्त केले

निदर्शनास आले. त्यानंतर तटरक्षक दलाच्या जहाजांनी आणि विमानांनी या बोटीचा पाठलाग सुरू केला. बोटीला घेरल्यानंतर तटरक्षक दलाच्या पथकाने तिच्यावर ताबा मिळवला. बोटीची झडती घेतली असता ५२६ किलो हेरॉईन आणि मेथाम्फेटामाईन आढळून आले. आंतरराष्ट्रीय बाजारात या अंमली पदार्थांची किंमत तीन हजार कोटींपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी बोटीवरील पाच पाकिस्तानी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले. पाकिस्तानी नागरिकांना मुंबईत आणले

जप्त केलेले अंमली पदार्थ आणि अटक करण्यात आलेल्या पाच पाकिस्तानी नागरिकांना कडेकोट सुरक्षेत मुंबई बंदरात आणण्यात आले आहे. येथे अंमली पदार्थ नियंत्रण कक्ष गुजरात, सीमाशुल्क विभाग आणि इतर केंद्रीय तपास यंत्रणांच्या संयुक्त पथकाकडून त्यांची चौकशी सुरू आहे. हे अंमली पदार्थ भारतातील कोणत्या भागात पोहोचवले जाणार होते, या तस्करीमागे कोणते आंतरराष्ट्रीय नेटवर्क कार्यरत आहे आणि या नेटवर्कमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास संबंधित यंत्रणांकडून सुरू आहे.

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख द्या

मिळालेला नसताना पंचनाम्याचे नाटक कशासाठी, असा सवालही रोहित पवार यांनी केला. नंदुरबार जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पालकमंत्र्यांनी पाहणी न केल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. सरकारमधील मंत्री तसेच प्रमुख नेत्यांची शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत जबाबदारी आहे. मात्र सरकारमधील प्रमुख नेते राजकारण करण्यात व्यस्त असल्याने त्यांना शेतकरी आणि त्यांच्या समस्यांचा विसर पडल्याचा आरोप त्यांनी केला.

गुजरातमधील भाजपच्या दोन प्रमुख नेत्यांसमोर राज्य सरकार झुकले असल्याचा आरोपही पवार यांनी केला. भाजपचे सरकार सत्तेत आल्यानंतर या नेत्यांना खूश करण्यासाठी नाशिकच्या खोऱ्यातील पाणी गुजरातला पळवले, मोठे प्रकल्प पळवले आणि त्यामुळे उत्तर महाराष्ट्राच्या हक्काच्या पाण्याचा वापर करण्याकडे सरकारचे दुर्लक्ष झाल्याचा दावा त्यांनी केला.

निवडणूक प्रक्रियेबाबतही रोहित पवार यांनी सरकारवर आरोप केले. सरकार मतांची हेराफेरी करून सत्तेवर आले असल्याचा आरोप करत ज्ञानेश कुमार यांनी एसआयआरच्या माध्यमातून बंगालमध्ये सत्ता आणल्याचा दावा त्यांनी केला. मतदानाची चोरी झाल्यामुळे सरकार सत्तेवर आले असून आमदार, खासदार विकत घेतल्यानंतर जनसामान्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याची गरज काय, असा सरकारचा समज झाल्याचा आरोप त्यांनी केला. आम्ही विरोधात असलो तरी जनसामान्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या प्रश्नांसाठी लढत राहू, असेही पवार यांनी सांगितले. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या माध्यमातून सरकार अध्यक्षांसह आरोपींना वाचविण्याचे काम करत असल्याचाही आरोप त्यांनी केला.

नंदुरबारनंतर धुळे आणि जळगाव जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून शेतकरी व नागरिकांशी संवाद साधणार असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

**आ.पवारांनी आ.डॉ.विजयकुमार गावितांची भेट**

शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार रोहित पवार यांनी महाराष्ट्र राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री तथा विद्यमान भाजपाचे आमदार डॉ विजयकुमार गावित यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.

आ.डॉ.विजयकुमार गावित हे सलग आठ महिने उपचारासाठी नाशिक व मुंबई येथे दाखल होते. त्या दीर्घ आजारानंतर साधारण महिनाभरापूर्वी डॉक्टर गावित हे नंदुरबार येथे निवासस्थानी मुक्कामी परत आले आणि तेव्हापासून कार्यकर्त्यांची भेट घेत कार्यरत झाले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी डॉक्टर गावित यांची आवर्जून ही भेट घेतली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे अन्य वरिष्ठ पदाधिकारी तसेच भाजपाच्या अनुसूचित जमाती मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष डॉक्टर सुप्रियाताई गावित देखील उपस्थित होत्या.

## चितोड चौफुली जवळ वाहनचालकाची लुट

मारहाण केली. त्याच्याजवळील एक मोबाईल, पॅन्टच्या खिशातील दीड हजारांची रोकड जबरदस्तीने काढून घेत पसार झाले. याप्रकरणी अब्दुल रौफ याने दिलेल्या फिर्यादीवरून धुळे शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सहाय्यक पोलीस निरीक्षक पल्लवी टर्ले तपास करीत आहेत.

## शिवतीर्थ जवळील नाल्यालगत प्लॉट निर्मिती करणाऱ्या

क्षेत्रफळ वाढवून, नाला अत्यंत अरुंद करण्यात आला आहे. शहरात थोड्याशा पावसाने जेलरोड, सिव्हील हॉस्पीटल, जिजामाता हायस्कुल, महापालिका भागात प्रचंड पाणी तुंबत असते. नागरिकांच्या घरात, दुकानात प्रचंड पाणी शिरते, त्याचे आर्थिक नुकसान होते. प्रचंड मानसिक, शारीरिक त्रास होतो. त्याचे कारणच प्रमुख नाले सफाई होत नाही. काही ठिकाणी ते बंद झाले किंवा नाल्यावर अतिक्रमण केले म्हणून या नाल्यातून फाशीपुलापासून ते साक्री रस्त्याने पाणी वाहत असते. हा नाला बंद, अरुंद झाल्यास प्रचंड पाणी तुंबणार आहे. विकास कामांचे देखील नुकसान त्यामुळे होणार आहे. नागरिकांच्या जिवीतास व मालमत्तांचे नुकसान होणार आहे.

सदर प्लॉटधारकाने नाल्यामध्ये १८ इंची पाईप टाकून प्रवाह वळवला आहे. ३० फुटाचा नैसर्गिक नाला २ फुटाचा करुन ठेवला आहे. त्यासाठी कुठल्याही आवश्यक प्राधिकरणाची परवानगी घेतली नसल्याने, त्याच्यावर सर्वप्रथम बीएनएस कायद्यान्वये गुन्हे दाखल करावे. सदरचा नाला पुर्ववत करावा. तसेच नाल्यालगत प्लॉट निर्मिती केव्हा करण्यात आली ? या जागेचे ४० वर्षांपूर्वीचे रेकॉर्ड तपासावे. कुठल्या नियमाअंतर्गत नाल्यालगत प्लॉट निर्माण करण्यात आल. त्याची चौकशी करुन नाल्यालगतचा प्लॉट रद्द करण्यात यावा. कागदपत्रामध्ये फेरफार करणाऱ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

सदर तक्रारी विरुध्द गांभिर्याने दखल घेवून केलल्या कारवाईसंदर्भात आम्हाला १५ दिवसांत उलट टपाली कळवण्यात यावे अशा आशयाचे निवेदन शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी, धिरज पाटील, तेजस गोटे, भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, निंबा मराठे, प्रशांत भदाणे, डॉ.अनिल पाटील, आण्णा फुलपगारे, शिवाजी शिरसाळे, कपिल लिंगायत, अजय चौधरी, निलेश कांजरेकर यांनी दिले. संबंधितांविरोधात योग्य कारवाई न झाल्यास अधिकाऱ्यांच्या विरोधात न्यायालयीन कारवाई केली जाईल असाही इशारा या प्रसंगी देण्यात आला.

## अमृतमहोत्सवानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

प्रसिद्ध गायक श्री. हंसराज रघुवंशी यांच्या सुमधुर आवाजात भक्तिमय भजनसंध्या आणि नवी दिल्ली येथील साधो बँडचा भक्तिमय गीतगायनाचा कार्यक्रम रंगणार आहे.

तसेच ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायं. ६ ३०वाजता मुंबई-आग्रा महामार्गावरील ललिंग टोलनाक्याजवळ असलेल्या टॉपलाइन रिसॉर्टमध्ये अमृतमहोत्सव समितीतर्फे विविध मंत्रिमहोदयांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत श्री. ओमप्रकाशजी अग्रवाल यांना सन्मानपत्र प्रदान करून सत्कार केला जाणार आहे.

पान १ वरुन

## दुष्काळग्रस्त मदत उपाय योजनांची

नसल्याने जनावरांच्या चाऱ्यासह पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. राज्य सरकारने ट्रिगर-१ नुसार २६५ तालुक्यातील परिस्थितीचा विचार करून दुष्काळ जाहीर केला आहे. घोषणा केल्या प्रमाणे योजनांची अंमलबजावणी तातडीने व्हावी. दुष्काळी भागाचे तातडीने पंचनामे करून हेक्टरी पन्नास हजार आर्थिक मदत द्यावी. रोहयो ची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने करून दररोज सातशे रूपये वेतन द्यावे. जनावरांना चारा छावण्या सुरू कराव्यात. ग्रामीण भागात पाण्याचा पुरवठा करण्यासाठी तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली पाणी पुरवठा समिती गठीत करून योग्य नियोजन व्हावे. रेशनिंग व्यवस्था सदोष व्हावी, नागरिकांना पुरेशा प्रमाणात खाद्य वस्तुंचा पुरवठा व्हावा. विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करावे. शेती पंपाचे विज बिल सरसकट माफ करा. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा. शेतीचे सरसकट कर्ज माफ करा. आदि मागण्यांचा समावेश आहे.

मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास भारतीय कम्युनिस्ट पक्षासह समविचारी सहकारी पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल. असा इशारा भाकपचे कॉ.पोपटराव चौधरी, कॉ.वसंतराव पाटील, कॉ. साहेबराव पाटील, कॉ.एल.आर.राव, कॉ. योगेश माळी, साथी गो. पि.लांडगे, साथी हरिश्चंद्र लोंढे, कॉ.सिध्दार्थ जगदेव, कॉ. आसीफ शेख, कॉ. राजेंद्र चौरे यांनी दिला आहे.

## देवभाने जवळ अनोळखी महिलेची

दिसू नये म्हणून या चादरीने मृतदेह झाकून ठेवण्यात आला होता. सदर घटनास्थळ महामार्गाच्या पश्चिम बाजूस असून धुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनच्या पश्चिम बाजूस मृतदेह ठेवण्यात आल्यामुळे महामार्गावरून येणारा जाणाऱ्याला तो सहज नजरेस पडणार नाही ाची मारेकऱ्यांनी दक्षता घेतल्याचे दिसून आले. परंतु बुधवारी सायंकाळच्या सुमारास बंद पडलेल्या कारखान्याजवळ शेळ्या चारणाऱ्या लहान मुलांच्या ही बाब प्रथम निदर्शनास आली. त्यांनी तातडीने याची माहिती देवभाने येथील पोलीस पाटलांना दिली. पोलीस पाटलांनी घटनेचे गांभीर्य ओळखून त्वरित सोनगीर पोलीस ठाण्यात संपर्क साधून खबर दिली.

घटनेची माहिती मिळताच , अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यासह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. याशिवाय सोनगीर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत ताकाटे, पोलीस उपनिरीक्षक रवींद्र बागुल, उपनिरीक्षक सोनवणे, पो. कॉ. विजय पाटील व रोहन वाघ यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून चौकशी सुरू केली आहे. २४ तास वाहतुकीची वर्दळ असलेल्या मुंबई-आग्रा महामार्गाजवळच हा प्रकार घडल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. सोनगीर पोलीस सध्या या महिलेची ओळख पटवण्याचे काम करत आहेत.

## लाचखोर तलाठीसह दोघांना दोन दिवस पोलीस कोठडी

रुपयांची लाच मागितली. ती रक्कम स्वीकारताना येथील गांधी पुतळा चौकात तिघांना पकडले. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या नाशिक येथील पथकाने कारवाई केली. त्यांच्याविरुद्ध आझाद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यांना जिल्हा न्यायालय धुळे येथे हजर केले असता दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिकच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा हांडोरे यांच्या नेतृत्वाखाली कारवाई झाली. पोलीस निरीक्षक पद्मावती तपास करीत आहेत.

## मंत्री वुईकेंच्या स्वागतप्रसंगी भाजप पदाधिकाऱ्यांची

दिसून आली. यामुळे साक्री तालुक्यातील भाजपच्या स्थानिक राजकारणात नेमके काय सुरू आहे ? याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. विशेषतः मंत्री वुइके यांच्या स्वागतासाठी आमदार मंजुळाताई गावित यांच्या समर्थकांची मोठी उपस्थिती असताना स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली.

दरम्यान, बारीपाडा येथील वनभाजी महोत्सव हा चैत्राम पवार यांच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून राबविला जाणारा उपक्रम असून, वनभाज्या, जैवविविधता व वनसंवर्धनाशी त्याचा संबंध आहे. भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची अनुपस्थिती नेमकी कोणत्या कारणामुळे नव्हती याबाबत संबंधितांकडून अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे या अनुपस्थितीमुळे साक्रीतील भाजपच्या अंतर्गत कलह, राजकारणाबाबत प्रश्न उपस्थित होत असले तरी त्यावर अधिकृत स्पष्टीकरणाची प्रतीक्षा आहे.

# स्व.तपनभाई पटेल यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त मान्यवरांसह नागरिकांनी वाहिली भावपूर्ण श्रद्धांजली

**शिरपूर, दि.३०- : स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांच्या सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त बुधवार, दि.३० सप्टेंबर २०२६ रोजी आर. सी. पटेल मेन बिल्डिंगमधील राजगोपाल भंडारी हॉल येथे सकाळी ९.३० ते ९.५० वाजेदरम्यान श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्थांचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी, युवक तसेच शहर व तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्व. तपनभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.**

माजी शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल, स्व. खासदार मुकेशभाई पटेल, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या परिवारातील युवा नेतृत्व म्हणून स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांची ओळख होती. त्यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त शिरपूर एज्युकेशन सोसायटी, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट तसेच श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, नागरिक यांच्या वतीने प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवर व नागरिकांनी गुलाबपुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.



स्व. तपनभाई पटेल यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा उल्लेख करताना त्यांच्या सामाजिक संपर्काची तसेच युवकांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधांची आठवण यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. शिरपूर शहर व तालुक्यातील हजारो युवकांसह विविध क्षेत्रातील नागरिकांशी त्यांचे आपुलकीचे संबंध होते. युवकांच्या विविध उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासोबतच शैक्षणिक, सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रातील विविध संस्थांच्या कार्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

**विविध संस्थांमध्ये महत्त्वाची जबाबदारी**

स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांनी विविध संस्थांमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. ते श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबईचे ट्रस्टी, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे उपाध्यक्ष, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे संचालक, शिरपूर-वरवाडे नगर परिषदेचे माजी नगरसेवक, शिरपूर टेक्स्टाईल पार्कचे चेअरमन तसेच दिसान ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे सह-कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत होते.

या विविध जबाबदाऱ्यांमधून त्यांचा शैक्षणिक संस्था, उद्योग क्षेत्र, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच युवक व सामाजिक क्षेत्राशी असलेला जवळचा संबंध दिसून येत होता. त्यांच्या कार्यकाळातील विविध आठवणींना पुण्यस्मरण दिनानिमित्त उपस्थितांनी उजाळा दिला.

श्रद्धांजली कार्यक्रमास शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, कोषाध्यक्ष बबनलाल अग्रवाल, सचिव सौ. रेषा पटेल, कमलकिशोर भंडारी, योगेश भंडारी, के. डी. पाटील, कैलासचंद्र अग्रवाल, देवेंद्र पाटील, अतुल भंडारी, विजय भंडारी, नितीन अग्रवाल, डॉ. उमेश शर्मा, नरेंद्रसिंग सिसोदिया, भटू माळी यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच नगरसेवक, शहर व तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, तपनभाई पटेल युवा मंचचे पदाधिकारी, चिंतनभाई पटेल युवा मंचचे पदाधिकारी, विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महिला, पुरुष तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी स्व. तपनभाई पटेल यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

**युवकांमध्ये आपुलकीचे स्थान**

स्व. तपनभाई पटेल यांचे व्यक्तिमत्त्व युवकांमध्ये विशेष आपुलकीचे होते. शिरपूर शहर व तालुक्यातील अनेक युवकांशी त्यांचा सातत्याने संपर्क होता. त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे विविध स्तरातील नागरिकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. त्यामुळे त्यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमास विविध क्षेत्रातील नागरिकांनी उपस्थित राहून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राशी, विविध उद्योग व संस्थांच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्राशी, तर स्थानिक स्वराज्य संस्थेतील कार्यामुळे सामाजिक व नागरी क्षेत्राशी त्यांचा संबंध राहिला. त्यामुळे त्यांच्या कार्याची आठवण सर्वत्र व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक विवेकानंद ठाकरे यांनी केले.

**पाहिजेत**
साडी दुकान कामासाठी खालील जागा भरणे आहे.
हेल्पर : २, सेल्समन :२ (लेडीज- जेन्टस).
-: संपर्क :-
मे.चंद्रकांत & कंपनी
किसनबत्ती खुंट, ग. नं. ५, धुळे
9422289809
7057761566

धुळ्यात 'प्लास्टो' आणी इतर सर्व नामांकित कंपनीच्या पाण्याच्या टाक्या आमच्याकडे होलसेल रेटमध्ये उपलब्ध आहेत..


१०० ते १०,००० लिटर पर्यंत गोल व चौरस टाक्या होलसेल रेट व हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहे.
धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण...
शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
फो. 9422285091

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

नगराध्यक्ष मा.श्री.अभिजितदादा पाटील
कल्पकतेचे धनी, उत्साहाचे वादळ, निर्णयक्षम जिद्द सर्वांना सोबत घेवून चालण्याची क्षमता, दानशूरता या सर्व गुणांचे आगार बनलेले आमचे आदरणीय दादासाहेब अभिजित पाटील यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा.....!
-: शुभेच्छूक :-
किरण लक्ष्मण पाटील (मुख्याध्यापक)
अनुपगिर साहेबरावगिर गोसावी (उपशिक्षक)
भरत पुरूषोत्तम पाटील (उपशिक्षक)
ज्योती निंबा सोनवणे (उपशिक्षिका)
रजनीबेन किशोरभाई पटेल (उपशिक्षिक)
जयेश दामू पाटील (उपशिक्षक)
खगेंद्र कांतीलाल कुंभार (उपशिक्षक)
जयदेव लिलाचंद पाटील (उपशिक्षक)
परेश विलास पाटील (उपशिक्षक)
योगेश्वर सुरेश पाटील (उपशिक्षक)
नितिन तुकाराम पाटील (क.लिपीक)
समाधान रमेश पाटील (शिपाई)
सिताराम चंद्रसिंग ठाकरे (शिपाई)
श्रीकृष्ण माध्यमिक विद्यालय फेस ता.शहादा

**घर भाड्याने देणे**
शुभाष चौक, फुले कॉलनी समोर, घर भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9822892958

**विकणे आहे**
अग्रवाल नगरच्या बाजूला ४ बीएचके फ्लॅट
अग्रवाल नगर जवळ नवीन 4 BHK बीएचके फ्लॅट त्वरीत विकणे आहे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**शॉप-दुकान विकणे**
मनोहर टाकीज समोर छत्रपती शिवाजी महाराज कॉम्प्लेक्समध्ये आग्रारोड टच दुकान विकणे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**विकणे आहे**
बडगुजर प्लॉटमध्ये ५००० फुट विकणे आहे.
धुळे शहरापासून अगदी जवळ बडगुजर प्लॉट सारख्या सुशिक्षित वसाहतीत ५००० फुटाचा दोन रोड कॉर्नर प्लॉट योग्य किंमतीत विकणे आहे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**तुळशीराम नगर प्लॉट विकणे**
धुळ्यातील सुप्रसिद्ध तुळशीराम नगरच्या पॉश वसाहतीत ३१०० फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**शेती विकणे आहे**
तिखी तलाव १ एकर शेती विकणे डेंडर गाव तलावाजवळ तिखी रोडटच एक एकर शेती फार्म हाऊस लायक विकणे आहे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**साक्री येथे प्लॉट**
प्लॉट साक्री आमच्याकडे प्राईम लोकेशन मध्ये प्लॉट आहेत नविन प्लॉट योग्य दरात स्वीकारले जातील.
-: संपर्क :-
9096219686

**प्लॉट विकणे आहे**
33X60 प्लॉट दत्त मंदिर चौक, माहेर हॉस्पिटल जवळ, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
LG प्रॉपर्टीज
9793093955

**प्लॉट विकणे आहे**
नगांव येथील अंदाजे १००० स्क्वे.फुट प्लॉट योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
-: संपर्क :-
प्रसाद पाटणकर
9422275567

**पाहिजेत**
अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
गल्ली नं. २, अकबर चौक, धुळे
9422286958

**पाहिजे**
कन्स्ट्रक्शन कंपनीसाठी अकौन्टंट व साईट सुपरवायझर पाहिजे.
अनुभव असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
8087738316

**गाळे विकणे**
टावर गार्डन जवळ दुसरा मजला फर्निचर व A/C सह गाळे विकणे आहे.
-: संपर्क :-
9422288002

**पाहिजेत**
नामांकित कंपनीमध्ये मुले पाहिजेत.
दुचाकी (टू-व्हिलर) आवश्यक.
टिप : शिक्षण १० वी, १२ वी पास
-: मोबाईल क्रमांक :-
9588414547
7666584449

**पाहिजेत**
सुप्रसिद्ध बेकरी मध्ये Sales and Delivery प्रतिनिधी पाहिजे.
लिहिता, वाचता, हिशोब करता येणे आवश्यक
चांगला पगार व इंसेंटिव
लाईफ लाईन बेकरी
मालेगांव रोड, धुळे
: संपर्क :
7507699616

**WANTED**
PART OR FULLTIME PHARAMCIST
CONTACT
8788637592

godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.

आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०